पुढारी



नाशिक : नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्ट आणि विविध कंपन्यांनी एकत्रित येऊन आयोजित केलेल्या नाशिक रनमध्ये सामाजिक बांधिलकीसाठी हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवला. /...वृत्त ८ (छाया : हेमंत घोरपडे)



पुढारी



# मैत्री आणि सद्भावनेसाठी धावले नाशिककर!

**नाशिक : प्रतिनिधी**

सकाळची गुलाबी थंडी आणि ढगाळ वातावरण असतानादेखील लहान मुले आणि वृद्धांसह हजारो नाशिककर मैत्री आणि सद्भावनेचा संदेश देण्यासाठी धावले. निमित्त होते नाशिक रनचे.



नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्ट आणि शहरातील विविध कंपन्यांनी एकत्रित येऊन नाशिक रन २०१८ चे आयोजन केले होते. महात्मानगर क्रिकेट मैदानावर सकाळी ८.३० वाजता प्रत्यक्ष रनला प्रारंभ झाला. आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, महापौर रंजना भानसी, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष एच. बी. थोन्टेश आदींनी रनला हिरवा झेंडा दाखविला. सर्वप्रथम दिव्यांग बांधवांची रन पार पडली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांची रन पार पडली. सरतेशेवटी हजारो नाशिककरांनी निळा टी-शर्ट परिधान करत दौड लगावली. यावेळी नागरिकांनी मैत्री आणि सद्भावनेचा संदेश दिला. परदेशी नागरिकही रनमध्ये सहभागी झाले होते.

रनच्या प्रारंभी कविता राऊत आणि मान्यवरांच्या हस्ते नाशिक रन ज्योत प्रज्वलित करण्यात आली. त्यानंतर तिरंगा फडकवून राष्ट्रगीत म्हणण्यात आले. या मुख्य सोहळ्यानंतर आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थिनी तेजस्विनी देवडे, भारती भुसारे व दीपाली या तिघींना नाशिक रनतर्फे सायकली भेट देण्यात आल्या. रनच्या प्रारंभी नाशिककरांनी झुम्बावर ठेका धरला. तसेच, अतुल नारंग डान्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

नाशिक रनचे सचिव अनिल दैठणकर, राजाराम कासार, विश्वस्त अविनाश चिंतावार, मुकुंद भट, अतुल खानापूरकर, संदीप पांडे, प्रबळ रे आणि गोविंद बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली १५० स्वयंसेवकांनी रनचे संयोजन केले.

## नाशिक रनला हजारो नागरिकांची उपस्थिती



### धावपटूंना एक कोटी दहा लाखांची मदत

टोकियो येथे २०२० मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकच्या तयारीसाठी नाशिकमधील क्रीडापटूंना एक कोटी दहा लाख रुपयांच्या मदतीचे धनादेश देण्यात आले. कविता राऊत, अभिजित हरकुड, किसन तडवी, पूनम सोनवणे यांनी हे धनादेश स्वीकारले. यावेळी प्रशिक्षक विजेंदर सिंगदेखील उपस्थित होते. यावेळी नाशिक रन प्रायोजित टेलिमेडडिसन या आयुर्वेदिक प्रकल्पाच्या कराराची प्रत सौमित्र भट्टाचार्य आणि एच. एस. बॅनर्जी यांच्या हस्ते टेलिमेडिसीन अधिकाऱ्यांकडे सुपुर्द करण्यात आली.

### स्पर्धकांसाठी लकी ड्रॉ

नाशिक रनमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाची नोंदणी करण्यात आली होती. रननंतर सकाळी १० वाजेच्या सुमारास लकी ड्रॉ काढण्यात आला. यावेळी लकी ड्रॉमध्ये नंबर आलेल्या स्पर्धकांना टीव्ही, सिंगल बेडचा सेट यांसह विविध पारितोषिके देण्यात आली. शहरातील विविध कंपन्यांनी प्रायोजकत्व देत बक्षिसाची जबाबदारी स्वीकारली.

### २०१९ साठी टीडीकेकडे हस्तांतरण

२०१८ च्या नाशिक रनच्या यशस्वी आयोजनानंतर सन २०१९ मध्ये होणाऱ्या नाशिक रनचे हस्तांतरण बॉशकडून टीडीके इप्कॉसकडे करण्यात आले. बॉश कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य यांनी टीडीके इप्कॉसचे व्यवस्थापकीय संचालक व नाशिक रनचे संस्थापक विश्वस्त नटराजन बलाकृष्णन यांच्याकडे पुढील वर्षाच्या रनच्या आयोजनाची धुरा सोपविली.



पुढारी

### रनच्या मार्गावर सेवा केंद्र

महात्मानगर येथून सुरू झालेल्या या रनचा मार्ग भोसला मिलिटरी स्कूलपर्यंत होता. या मार्गावर पाच ठिकाणी नागरिकांसाठी वैद्यकीय सेवा केंद्रे उभारण्यात आली होती. या केंद्रावर १० तज्ज्ञ डॉक्टर्स, तसेच २० स्वयंसेवक तैनात करण्यात आले होते. याशिवाय एचडीएफसीकडून नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. बीव्हीजे इंडिया कंपनीने खास तीन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या होत्या.











(सर्व छायाचित्रे : हेमंत घोरपडे)